**स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील शाळा**
**परवानगी आदेश**

जा.क्र./स्वयंअ/मावि-1/2014-2014/**8013/8301**
विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद
औरंगाबाद विभाग औरंगाबाद,
दिनांक :- **29/03/2014**

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
सहारा एज्यूकेशन सोसायटी, सिडको एन-4 औरंगाबाद

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी **2014-2015** या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्या बाबत.

संदर्भ :-1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 (सन 2013 चा 01)
2) शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र.40/एसएम-2,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई 31 दिनांक 26/02/2014.

उपरोकत विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2014-2015 मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विधमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. 02 च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व सविस्तर पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांवव पत्ता | माध्यम | **शाळेचा प्रकार** नविन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| **1483** | सहारा एज्युकेशन सोसायटी, सिडको एन-4 औरंगाबाद | जयभंद्रा माध्यमिक विद्यालय रांजनगांव (शे.पुं.) ता.गंगापूर जि. औरंगाबाद | **मराठी** | **माध्यमिक दर्जावाढ** | **इ. 9 वी** | **2014-2015** |

**अटी व शर्ती**

1) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

2) पात्र ठरलेल्या संबंधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, 2009** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालील प्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या** आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन 2014-2015 करिता या संदर्भ क्र. 2 च्या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक **20 जून 2012** मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी **मान्यता (Recognition)** सदर शासन निर्णयातील परिच्छेद (10) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडुन मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

पान दोन..

3) वरलि विवरण पत्रातील परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना :-
   i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच.
   ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापनाव विनियमन) अधिनियम, 2012** (सन 2013 चा 01) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी अधिनियम,2009 मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्या बाबतची पुढील कार्यवाही करावी.

5) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

6) **यु-डायस डाटा-**या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District information System for Education) मध्ये माहिती भरतांना **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधिताच्या माहितीकरीता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा,** असा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

7) दर्जावाढ मंजूर झालेल्या शाळामध्ये भौतीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act.2009 मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी संस्थांतर्गत शाळांना या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

**(रा.वि.गोधने)**
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

**प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर**

1) मा.रा.ग.गुंजाळ,अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई.
2) मा.शिक्षण संचालक,( प्राथमिक)/(माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-1.
3) संबंधित संस्था अध्यक्ष/सचिव/ मुख्याध्यापक. यांना माहितीसाठी.
4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/**माध्यमिक)** जिल्हा परिषद,**औरंगाबाद** यांना देवून कळविण्यात येते की, संस्थेने प्रस्ताव सादर करतांना दाखल केलेल्या कागदपत्राची खातरजमा करावी तसेच शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र.40/एसएम-2,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई 31 दिनांक 26/02/2014. तसेच शासन निर्णयामधील 1.2 **अपात्र शाळा** स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावाच्या तपशीलासह आपल्या जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिकरित्या कळविण्यात यावे व त्याची प्रत मा. संचालनालयास व या कार्यालयास सादर करावी. विहित मुदतीत व नमुन्यात सदर शाळेचा 3.1 खाते मान्यतेचा प्रस्ताव तपासणी अहवालासह या कार्यालयास सादर करावा.